'राहुल सोलापूरकरला गोळ्या घालूनच मारलं पाहिजे, जिथे दिसेल तिथे ठेचा आणि गाडा'; उदयनराजे संतापले

सोलापूर : अभिनेता राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. सोलापूरकरने युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांनी आग्ऱ्याहून सुटका करताना औरंगजेबाच्या सरदारांना लाच दिल्याचे वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा तीव्र निषेध करत छत्रपतींचे वंशज आणि खासदार उदयनराजे भोसले यांनी राहुल सोलापूरकरला जाहीर धडा शिकवण्याचा इशारा दिला आहे. 'राहुल सोलापूरकर जिथे दिसेल तिथे त्याला ठेचा आणि त्याला गाडा,' असा संतप्त आदेश त्यांनी शिवप्रेमींना दिला आहे.

''त्यांना वेचून ठेचलं पाहिजे': 'केवळ मलाच नाही तर तमाम शिवभक्तांना या विधानामुळे वेदना होत आहेत. हा राहुल सोलापूरकर कोण आहे ? तो म्हणाला लाच ! जे लाच घेतात त्यांना लाचखोरीशिवाय काही समजत नाही. असं बोलताना जिभेला हाड नसतं हे माहीत आहे. पण लावली जीभ टाळ्याला आणि काहीही बडबडायचं ? अशा लोकांच्या जिभा हासडल्या पाहिजेत. महापुरुषांबद्दल अशी

विधाने करणाऱ्यांना दिसेल तिथे ठेचलं पाहिजे. वेचून ठेचलं पाहिजे,' असा संतप्त उद्रेक उदयनराजेंनी केला. 'ही विकृती जर अशीच वाढत राहिली तर देशाच्या अखंडतेला धोका निर्माण होईल. वेगवेगळ्या जातीधर्मात अशा विकृतांमुळे तेढ निर्माण होते,' अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

अमित शहांची भेट घेणार; देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी:

उदयनराजे भोसले यांनी या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली असून त्यासाठी ते लवकरच गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. 'मी लवकरच देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा यांची भेट घेणार आहे. अशी विधाने करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला

सोलापूरकरला तुरुंगात टाकण्याची मागणी:

'असे लोक इतिहासाला वेगळं वळण देतील. कालांतराने शिवाजी महाराजांना वेगळं दाखवतील. आज आपण शिवाजी महाराजांची प्रतिमा देव्हाऱ्यात ठेवतो. कारण, बाकीच्यांनी साम्राज्य वाढवण्यासाठी लढाया केल्या, पण शिवाजी महाराज गोरगरिबांसाठी लढले. स्त्रियांचं संरक्षण केलं. परकीय आक्रमण थोपवलं. त्यांच्यावर कारवाई करा. देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा. त्यांना तुरुंगात टाका. मी एक-दोन दिवसांत अमित शहा यांची भेट घेणार आहे. आधीही त्यांना भेटलो होतो. खासदार असो की मंत्री असो, अशा लोकांना शोधून गाडलं पाहिजे. ठेचलं पाहिजे. ही चूक नाही तर घोडचूक आहे. औरंगजेबाच्या भेटीला जाताना लाच दिली म्हणून भेटीला गेले ? तसे नव्हते. ते त्यांच्या शौर्यचे प्रतीक होते. लाच कशाला देतील ? त्या राहुल सोलापूरकरची लायकी काय आहे ? त्याने तसे विधान केले तर त्याला औरंगजेबाची औलादच म्हणावला पाहिजे. त्याच्यावर किती चर्चा करायची ? त्याला ठेचा ना. किती वेळ लागतोय ?' असा संतप्त सवालही उदयनराजेंनी उपस्थित केला.

पाहिजे,' अशी मागणी त्यांनी केली. 'शिवाजी महाराजांचे विचार आपण जपले नाहीत तर देशाचे तुकडे व्हायला फार काळ लागणार नाही. विकृत विधाने करणाऱ्यांना वेळीच थांबवलं पाहिजे. त्यांचे सिनेमे बंद केले पाहिजेत. निमार्ते, दिग्दर्शकांनीही अशा लोकांना थारा देऊ नये,' असे आवाहनही त्यांनी केले.

'त्याला आणि अशा सगळ्यांनाच गोळ्या घातल्या पाहिजेत':

'या लोकांना गाडलं पाहिजे. त्यांना गाडलं नाही तर देशाच्या अखंडतेचा प्रश्न आहे. मी अत्यंत कठोर शब्दांत याचा निषेध करतो. मला विचारायला तर त्याला गोळ्या घालूनच मारलं पाहिजे. त्यालाच नाही तर असे जे जे लोक असतील त्या सर्वांना गोळ्या घातल्या पाहिजेत. कुणीही उठायचं आणि बेताल विधानं करायची ? जीवाची पर्वा न करता शिवाजी महाराज पुढे गेले. अशा महापुरुषांबद्दल अशी विधाने होत असतील तर दुसरा काही पर्याय नाही. तो जिथे दिसेल तिथे त्याला ठेचा आणि गाडा,' असा तीव्र संताप उदयनराजेंनी व्यक्त केला.

चैतन्य तुपेचा शोध लागला! अपहरणकर्त्यांच्या गाडीचा अपघात, पोलिसांनी सोडला नाही पिच्छा

जालना : छत्रपती संभाजीनगर येथून चैतन्य सुनिल तुपे या सात वर्षीय मुलाला अपहरण करून घेऊन जात असलेल्या गाडीला मंगळवारी, 4 फेब्रुवारी रोजी राञी 10 वाजता आसई पाटीजवळ अपघात झाला. अपघातात जखमी झालेल्या प्रणव समाधान शेवत्रे याला नागरिकांनी पकडून भोकरदन ग्रामीण रुग्णालयात आणले व पोलिसांच्या ताब्यात दिले. मात्र चार अपहरणकर्त्यांनी राञी दुसरी गाडी बोलावून घेत चैतन्यला घेऊन चिखलीकडे पोबारा केला. दरम्यान, मागावर असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील पोलीस पथकास अपहरणकर्ते ब्रम्हपुरी येथे सापडले आहेत. मुलाला पोलीसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे. अपहत मुलाला घेऊन फुलंब्री, हासनाबाद, भोकरदन, मार्गे जाफराबादकडे भरधाव वेगाने जात असताना 4 फेब्रुवारी राञी 10 वाजेच्या दरम्यान आसई पाटीजवळ भाजीपाला भरण्यासाठी उभ्या असलेल्या एका गाडीला जोरात धडक दिली. यात अपहरणकर्त्यांच्या गाडीचा चुराडा झाला. मात्र, जखमी असलेल्या आरोपींनी अंधाराचा फायदा घेऊन मुलासह शेजारच्या शेतात पळ काढला. यावेळी ज्यांच्या गाडीला यांनी धडक दिली त्या गजानन भावले (रा वालसा वडाळा) यांनी यातील प्रणव समाधान

शेवत्रे (रा. ब्रम्हपुरी ता जाफराबाद) याला पळून जात असताना पकडून ठेवले. त्यानंतर त्यांना भोकरदन येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यामुळे चैतन्यचे अपहरणकर्ते समोर आले आहेत. अद्याप चैतन्यचा शोध लागला नाही. भोकरदन ग्रामीण रुग्णालयात चैतन्यच्या नातेवाईक व नागरिकांनी मोठी गर्दी केल्यामुळे पोलिसांनी प्रणव शेवत्रे याला भोकरदन पोलिस ठाण्यात आणण्यात आले आहे.

जालन्याचे पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे यांनी भोकरदन पोलिस ठाण्यात भेट देऊन या प्रकरणाची माहिती घेतली आहे.

अपहरणकर्ते जाफराबाद येथील पोलिसांच्या ताब्यात मिळाला नव्हता मात्र तयाच्या सोबत असलेल्या अपहरण कर्त्यांची नावे प्रणव शेवत्रे याने पोलिसांना हर्षल शेवत्रे, ज्ञानेश्वर शेवत्रे, जीवन नारायण शेवत्रे सर्व (रा ब्रम्हपुरी ता जाफराबाद) येथील असल्याचे सांगितले, हे आरोपी छत्रपती संभाजी नगर येथे काम करतात तर एक पुण्याला असतो तर प्रणव हा छत्रपती संभाजी नगर येथील छत्रपती विद्यालयात बीसीएस प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे.

अपहरणकर्ते चिखलीत आढळले

भोकरदन ग्रामीण रुग्णालयात छत्रपती संभाजी नगरचे वरिष्ठ पोलिस अधिकारी संदिप गुरमे, भोकरदनचे पोलिस निरीक्षक किरण बिडवे, पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे, पोलिस उपनिरीक्षक पवन राजपूत यांनी प्रणव शेवत्रे याचा जबाब घेतला. त्यानुसार पोलिस अधिकारी व पथक मुलाचा शोध घेण्यासाठी चिखली जिल्हा बुलडाणाकडे रवाना झाले आहेत. आरोपी यांनी चिखली येथे औषधी घेत असल्याचे समोर आले आहे.

दोन नंबर प्लेटचा वापर

छत्रपती संभाजीनगर येथून मुलाचे अपहरण करताना आरोपींनी गाडीला एमएच 25 1126 या क्रमांकाची नंबर प्लेट वापरली. तर अपघात झाला तेव्हा गाडीला एमएच 20 ई ई 7126 ही नंबर प्लेट वापरली आहे. वास्तविक ही गाडी छत्रपती संभाजी नगर येथे गाडी मालकाच्या घरासमोर उभी आहे.

'जिल्हा उपनिबंधक'मधील दोन अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात

ओरोस : सिंधुदुर्गनगरी येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयात दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. जिल्हा उपनिबंधक वर्ग 1 चे अधिकारी माणिक भानुदास सांगळे (वय 56) व कार्यालय अधीक्षक वर्ग 3 च्या अधिकारी उर्मिला महादेव यादव 33 हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात मिळून आले. या कारवाईमुळे सहकारी क्षेत्रात एकच खळबळ उडाली.

ही कारवाई मंगळवारी सायंकाळी या विभागाचे पोलिस उपअधीक्षक अरुण पवार यांनी लावलेल्या सापळ्यात हे दोन्ही अधिकारी अडकले.गृहनिर्माण संस्थेच्या नोंदणी कामी तक्रारदार यांचे श्री स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था मयार्दित, रेवतळे, मालवण, जि. सिंधुदुर्ग या गृहनिर्माण संस्थेच्या अभिहस्तांतरण आदेशाप्रमाणे अंमलबजावणी करून जमीन संस्थेच्या नावे करण्याकरिता रुपये 50 हजार रकमेच्या लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार 10 जानेवारी 2025 रोजी केली होती. त्यानुसार 16 जानेवारी 2025 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान संशयित आरोपी

लोकसेविका उर्मिला यादव यांनी तक्रारदार यांच्याकडे 40 हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार मंगळवारी करण्यात आलेल्या दुसऱ्या पडताळणीदरम्यान माणिक सांगळे व उर्मिला यादव 33 हजार रुपयांची लाच घेताना प्रत्यक्ष मिळून आले. दोन्ही संशयितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवारी सायंकाळ उशिरापर्यंत सुरू होती. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक अरुण पवार, सिंधुदुर्ग पोलिस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मनोज जिरगे, पोलिस जनार्दन रेवंडकर, रविकांत पालकर, प्रथमेश पोतनीस, विशाल नलावडे, संजय वाघाटे, समिता झिरसागर यांच्या पथकाने केली.

गोवंश तस्करी करणाऱ्या ट्रकला अपघात. ३५ जनावरे दगावली

गोंदिया : गोवंशाची तस्करी करणारा ट्रक रस्त्यावर उलटला. वायूळे घडलेल्या अपघातात ३५ जनावरे ठार झाली. ही घटना आज बुधवार ५ फेब्रुवारी २०२५ रोजी गोंदिया जिल्ह्यातील चिचगड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कोरची ह्या चिचगड मार्गावरील डासगड घाटावर मध्य रात्री सुमारास घडली. अपघात घडल्यानंतर ट्रकचालक पसार झाला असता चिचगड पोलिसांनी त्या वाहन चालकाला सकाळच्या सुमारास ताब्यात घेतले. गोवंशीय ३५ जनावरे घेऊन जाणारा एम.एच. ३० बीडी १०९५ क्रमांकाचा ट्रक कोरची ते चिचगड मागनि जात होता. डासगड प्रवेश द्वारा समोरील घाटाच्या वळण रस्त्यावर ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. या अपघाताट ट्रक मध्ये असलेली ३५ जनावरे जागीच ठार झाली तर काही जनावरे जखमी झाली आहेत. ट्रकच्या केबिनमध्ये रक्ताचे डाग आढळल्याने ट्रक चालक ही जखमी झाल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. सदर ट्रक अपघात या घटनेची माहीती चिचगड पोलिसांना देण्यात आली आहे. तर चिचगड मार्गे ही जनावरे कुठुन आणून वाहतूक केली जातात याचा तपास

आता चिचगड पोलिस करीत आहेत. यात विशेष म्हणजे गोंदिया तालुक्यातील चरगिा या गावातून पण मोठ्या प्रमाणात गोवंश तस्करी करून याच चिचगड - ककोडी - कोरची मार्गे हैदराबादला पाठविले जातात. यातील गोवंश तस्कर कधी पोलिसांच्या तावडीत सापडतात तर कधी पळून जातात मध्यरात्रीच्या सुमारास ही तस्करी होत असल्यामुळे पोलिसांना कारवाई करणयात अडचण निर्माण होते. देवरी तालुक्यातील चिचगड पोलिस ठाणे अंतर्गत अवैध जनावरे वाहतूक करणाऱ्या वाहनावर मागील जानेवारी महिन्यामध्ये तीन कार्यवाया झालेल्या आहेत. बुधवारी सकाळी या घटनेची माहिती मिळताच घटना स्थळ गाठून चिचगड पोलिसांनी कारवाई केली आहे. पण चिचगड पोलिस स्टेशन छत्तीसगड व गडचिरोली जिल्ह्याला लागून असल्याने मध्यरात्री दरम्यान येथून अवैध जनावरे वाहतूक छुप्या मार्गाने ही होते.

शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधनाचा वापर करा

अकोला : कृषी पदवीधरांनी शिक्षण, तंत्रज्ञान, संशोधन यांचा वापर शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व शेती क्षेत्राच्या प्रगतीसाठी करावा, असे प्रतिपादन विद्यापीठ कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ३९ वा दीक्षांत समारंभ राज्यपालांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. प्रतिकुलपती तथा राज्याचे कृषी मंत्री अँड. माणिकराव कोकाटे, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अँड. आकाश फुंडकर, कर्नाटक कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष अशोक दलवाई, कुलगुरू डॉ. शरद गडाख, आमदार अमोल मिटकरी, आमदार हरिश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. समारंभात विविध विद्याशाखांच्या एकूण ४ हजार ४० स्नातकांना विविध पदव्या प्रदान करण्यात आल्या. राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले की, ज्ञान मिळवणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. देशाच्या कृषी क्षेत्राला अधिकाधिक प्रगत करण्याची जबाबदारी नवपदवीधरांना

पार पाडायची आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने बीजनिर्मिती, पशुधन विकास, आदर्श ग्राम प्रकल्प अशा उपक्रमांबरोबरच नवनव्या अभ्यासक्रमातून अनेक विद्याशाखांचा विकास केला आहे.

ते पुढे म्हणाले की, ज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची झेप जगभरात देदिप्यमान ठरली आहे.

औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्रातही तितकीच उल्लेखनीय प्रगती करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानप्राप्ती, त्याचे उपयोजन व करावयाचे कार्य याबाबत निश्चित ध्येय ठरवून त्यानुसार वाटचाल करावी.कृषी मंत्री . कोकाटे म्हणाले की, जगभरात विविध क्षेत्रांत अनेकविध बदल होत असून, त्यानुसार कृषी क्षेत्रातही बदल घडवणे आवश्यक आहे. शेतीच्या उत्पादनखर्चात कपात व उत्पन्नात वाढ यासाठी नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. त्याष्टीने शासन पावले उचलत आहे. ह्यएआयह्वसारख्या नवतंत्रज्ञानाचा वापर शेतीसाठी व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

दलवाई म्हणाले की, शाश्वत विकासासाठी कृषी उत्पादन प्रणालीची पुनर्रचना करताना कृषी पर्यावरणशास्त्र आणि सेंद्रिय शेतीची सांगड घातली पाहिजे. जैवविविधतेची जपणूक, विषमुक्त व सुरक्षित अन्निर्मिती, मृद संवर्धन, जलसंवर्धन होणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी पर्यावरण व सेंद्रिय शेतीशास्त्र डोळ्यांसमोर ठेवून त्या दृष्टीतूनच कृषी संशोधन पुढे जावे. एकविसाव्या शतकातील संशोधनाची दिशा पर्यावरण संवर्धक असावी, असे आवाहन त्यांनी केले.

रुग्णास घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा भीषण अपघात पहाटेच्या दुर्घटनेत 2 ठार 5 जखमी

नाशिक : रुग्णवाहिकेची अज्ञात वाहनाला पाठीमागून धडक बसू दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या दुर्घटनेत 5 जण जखमी झाल्याची घटना समृद्धी महामार्गावर आज पहाटेच्या सुमारास घडली. समृद्धी महामार्गावरील हडूस पिंपळ गाव शिवारात बुधवारी पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास अपघाताची घडली. या अपघातात समीर मोहम्मद (वय 57 वर्षे) राहणार बिहार व अमीना खातून (वय 52 वर्षे) राहणार बिहार अशी अपघातातील मयतांची नावे आहे. रुग्णवाहिकेचा या दुर्दैवी अपघातात प्रकाश विक्रम पाटील (वय 45) राहणार नाशिक, मोहम्मद इम्तियाज (वय 40) राहणार बिहार, गुलाबसा खातुन (वय 20) राहणार बिहार, सचिन रामदास खरे (वय 42) वर्षे राहणार नाशिक, हासीब समीर मोहम्मद (वय 37) राहणार बिहार हे या अपघातात जखमी झाले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, समीर मोहम्मद या रुग्णाला घेऊन त्यांचे नातेवाईक रुग्णवाहिका क्रमांक एम एच 15 ईएफ 0089 ने नाशिक येथून पटणा येथील एम्स रुग्णालयाकडे जात होते. बिहारकडे जात असताना आज पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास हडस पिंपळगाव शिवारात अज्ञात वाहनाशी रुग्णवाहिका पाठीमागून धडकली. अपघाताच्या घटनेनंतर अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात उपाचारासाठी दाखल करण्यात आले असून पोलिसांनी घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, अपघातामध्ये रुग्णवाहेकेचेही मोठं नुकसान झाल्याचं पाहायला मिळालं. रुग्णवाहिकेला क्रेनच्या सहाय्याने रस्त्यावरुन हटविण्यात आले आहे.

गाड्या फोडून दशहत माजवली, पोलिसांनी त्याच रस्त्यावर माज उतरवला, कारवाईची तुफान चर्चा

बिबवेवाडी : पुण्यात दर दुसऱ्या दिवशी गाडी फोडण्याच्या घटना घडत असतात. या गाड्या फोडून काही आरोपींना परिसरात आपली दहशत माजवायची असते. मात्र या आरोपींचा आता त्याच रस्त्यावर धिंड काढून पोलिसांनी चांगलाच माज उतरवला आहे. या संदर्भातला व्हिडिओ देखील समोर आला आहे. त्यानंतर पोलिसांच्या कारवाईचे कौतुक होत आहे. पोलिसांकडून मिळालेल्या

माहितीनुसार, काल रात्री बिबवेवाडी परिसरात असणाऱ्या भागात 40 ते 50 गाड्यांची आरोपींकडून तोडफोड करण्यात आली होती. परिसरात आपली दहशत माजवण्यासाठी आरोपींनी ही तोडफोड केली होती.या तोडफोडीनंतर पोलिसांनी अंडी उर्फ निरंजन देवकर ,अभिषेक पांढरे, गणराज सुर्नील ठाकर अशा तीन आरोपींना अटक केली होती. या अटकेनंतर पोलिसांनी त्याच्या स्टाईलमध्ये आरोपींची दहशत मोडून काढली आहे.

TOMORROW TECHNOLOGIES GLOBAL INNOVATIONS LTD.

(FORMERLY KNOWN AS CNI RESEARCH LTD.)

CIN: L45202MH1982PLC041643

Registered Office: A-120, Gokul Arcade, Sahar Road Opp Garware House Vile Parle E, Mumbai, Maharashtra, 400057.

Statement of Standalone Unaudited Results for the Quarter ended 31/12/2024

(Rs. In Lacs/amount)

	Particulars	Current Quarter ending 31-12-2024 (Un-Audited)	Preceding 3 months ended 30-09-2024 (Un-Audited)	Corresponding 3 months ended in the previous year 31-12-2023 (Un-Audited)	Year to date (Nine Months ended) 31-12-2024 (Un-Audited)	Corresponding year to date ended in the previous year 31-12-2023 (Un-Audited)	Year Ended 31-03-2024 (Audited)
1	Total Income from Operations	5.01	16.67	158.12	440.24	731.71	1042.05
2	Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#)	(89.67)	(316.14)	(20.25)	(384.03)	56.88	84.99
3	Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items and/or Extraordinary items#)	(89.67)	(316.14)	(20.25)	(384.03)	56.88	84.99
4	Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#)	(89.67)	(316.14)	(20.25)	(384.03)	56.88	83.51
5	Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	(89.67)	35.09	349.25	(384.03)	560.47	545.21
6	Equity Share Capital	1148.05	1148.05	1148.05	1148.05	1148.05	1148.05
7	Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year	343.36	343.36	(152.38)	(152.38)	343.36	343.36
8	Earnings Per Share (of Re.1/- each) (for continuing and discontinued operations) - 1) Basic:	(0.08)	(0.28)	(0.02)	(0.33)	0.05	0.07
	2) Diluted:	(0.08)	(0.28)	(0.02)	(0.33)	0.05	0.07

Notes:

a) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings).

b) The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.

c) # - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

For TOMORROW TECHNOLOGIES GLOBAL INNOVATIONS LTD.
(Formerly known as Cni Research Ltd.)
MR. KISHOR OSTWAL
MANAGING DIRECTOR
(DIN:00460257)

Date :- 05-02-2025
Place :- MUMBAI